BOOK-(11)

कॉम्रेड. एस. एम. पाटील गौरवग्रंथ

# शेती आणि शेतकरी आंदोलने

संपादक

दत्ता पाटील | सुरेश पवार



**शेती आणि शेतकरी आंदोलने**

संपादक
दत्ता पाटील
सुरेश पवार

**प्रथम आवृत्ती**
९ एप्रिल, २०२३

**© डॉ. दत्ता पाटील**
गडहिंग्लज
मो. ९४२११२८९६२७

**प्रकाशक**
**अक्षर दालन**
२१४१, बी वॉर्ड, मंगळवार पेठ,
कोल्हापूर. फोन : (०२३१-२६४६४२४)
email- akshardalan@yahoo.com

**मुखपृष्ठ**
गौरीश सोनार

**अक्षर जुळणी**
सौ. शिल्पा पराग कुलकर्णी

**मुद्रक**
मिरर प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर

**मूल्य ₹ १७५/-**

# अनुक्रमणिका

## विभाग - १ शेती आणि शेतकरी आंदोलने


१. मातीचे आरोग्य आणि शेती/१३
- ॲड. दशरथ दळवी

२. २०२०-२०२१ चे शेतकरी आंदोलन : वास्तव आणि अपेक्षा/१८
- प्रा. आनंद मेणसे

३. शेतकरी आंदोलनातील स्त्रियांचा सहभाग/२७
- डॉ. भारती पाटील

४. ऊसतोडणी व वाहतूक कामगारांच्या चळवळीची वाटचाल/३३
- कॉ. प्रा. सुभाष जाधव

५. शेतीचे यांत्रिकीकरण आणि शेतकरी संघटना/४१
- डॉ. भरतकुमार सोलापुरे

६. जागतिक शेतीवास्तव आणि भारतातील शेतमालाचा हमीभाव/५०
- प्रा. डॉ. जालंदर पाटील

७. किसान सभा व कृषी पतपुरवठा/५६
- डॉ. ज्ञानराजा चिघळीकर

८. शेतकरी हिताच्या धोरणाचा आग्रह/६१
- कॉ. माणिक अवघडे

९. एकविसाव्या शतकातील शेती आणि युवा शेतकरी/६४
- डॉ. दत्ता पाटील


## विभाग - २ व्यक्तिविशेष


१०. बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान कार्ल मार्क्सशी जोडणारा नेता/७२
- प्राचार्य कॉ.ए.बी.पाटील

११. राष्ट्रीय बसव दलात कॉ. एस. एम. यांचे योगदान/७५
- महेश एस्. आरभावी

१२. कृतिशील अध्यापक/७९
- एस्. एन. तथा बाळासाहेब कुट्रे

१३. डाव्या विचारसरणीचा पुरस्कर्ता कॉ. एस.एम./८२
- प्रा. महादेव माने

१४. लेकीच्या आयुष्यातील दीपस्तंभ : वडील/९४
- डॉ. पौर्णिमा पाटील-कमते

१५. माझे गौड्र (पाटील)/९९
- श्रीमती पार्वती पाटील

# किसान सभा व कृषी पतपुरवठा

**- डॉ. ज्ञानराजा चिघळीकर,** गडहिंग्लज

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानंतरही देशातील ६० टक्के लोकसंख्या ही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या आधुनिक काळातसुद्धा शेती व्यवसाय हा पूर्णपणे निसर्गावर आधारित असल्यामुळे शेतीमधील उत्पन्नाची शाश्वती देता येत नाही. राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा दिवसेंदिवस घटत जाऊन तो १८ टक्के इतका झाला आहे. एके काळी अन्नधान्यासाठी ओरड करणारा देश आज देशातील १४० कोटी लोकांची पोटाची गरज भागवून निर्यात करीत आहे. ही सारी किमया भारतीय शेतकऱ्यांनी रक्ताच पाणी आणि हाडाची काडं करून केली आहे. आजही शेतकऱ्यांच्या तीनच मुख्य मागण्या आहेत. त्या म्हणजे, शेतीला पाणी, गरजेला कर्ज आणि शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. परंतु देशातील सरकारांनी जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकरी राजाला मात्र या तिन्ही गोष्टीपासून वंचित ठेवले आहे. शेतकऱ्यांचे पाणी कारखानदारांनी आणि शहरांनी कधीच पिऊन टाकले आहे. सार्वजनिक बँकांच्या तिजोरीता देशातील भांडवलदार आणि कारखानदारांनी गिळंकृत केले आहे. शेतमालाच्या योग्य भावाची गेली पंचाहत्तर वर्षे प्रतीक्षा सुरू आहे. परिणामी, आज शेतकऱ्यांच्या गळ्याभोवती सावकारी कर्जाने विळखा घालून फास आवळला आहे. कधी नव्हे इतका शेतकरी आज आर्थिक संकटात आहे. म्हणूनच तो मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहे. आपली संपूर्ण हयात किसान सभा आणि डाव्या चळवळीसाठी समर्पित करणाऱ्या कॉम्रेड एस. एम. पाटील यांच्या प्रथम स्मृतिदिनी शेतकऱ्यांना

संकटातून सावरण्यासाठी किसान सभेसारख्या संघटनेची नव्याने मजबूत बांधणी करणे हीच खरी गरज आहे.

मुंबई येथे १९३४ साली झालेल्या काँग्रेस अधिवेशनात काँग्रेस सोशालिष्ट पार्टी गठीत करण्यात आली. त्यातूनच अखिल भारतीय किसान सभेची स्थापना ही ११ एप्रिल १९३६ रोजी झाली असली तरी, त्याची पार्श्वभूमी जुनी आहे. किसान सभेचे जनक म्हणून संबोधित केले जाते त्या स्वामी सहजानंद सरस्वती यांनी १९२९ साली सुरुवातीला बिहार प्रांतीय किसान सभेची स्थापना केली होती. उद्देश हा होता की जमीनदार वर्गाकडून शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात आवाज बुलंद करणे. याकरिता किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी गावोगावी जाऊन जमीनदारांकडून होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या तक्रारी जमा करण्यास सुरुवात केली होती. एप्रिल १९३५ मध्ये एन. जी. रंगा आणि ई. एम. एस. नंबुद्रीपाद यानी अखिल भारतीय किसान संघटना स्थापन करण्याची सूचना केली. त्यानुसार लखनौ येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात बिहार प्रांतीय किसान सभा आणि दक्षिण भारतीय किसान फेडरेशन यांच्या विलीनीकरणासह अखिल भारतीय किसान सभेची स्थापना करण्यात आली.

अखिल भारतीय किसान सभेचे पहिले अध्यक्ष म्हणून स्वामी सहजानंद सरस्वती यांची निवड झाली. किसान सभेमध्ये एन. जी. रंगा. ई. एम. एम. नंबुद्रीपाद, वरीनंद शर्मा, जदुनंदन शर्मा, राहुल सांकृत्यायन, यमुना करजी, पी. सुंदरय्या, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया, बंकिम मुखर्जी आणि आचार्य नरेंद्र देव यांच्यासारखी मातब्बर मंडळी होती. ऑगस्ट १९३६ मध्ये किसान मॅनिफेस्टो तयार करण्यात आला. त्यामध्ये जमीनदारी पद्धती नष्ट करून ग्रामीण कर्जे रद्द करण्यावर भर देण्यात आला. तसेच १९३७ मध्ये किसान सभेसाठी लाल रंगाचा झेंडा ध्वज म्हणून स्वीकारण्यात आला.

नंतरच्या काळात किसान सभा ही काँग्रेसपासून फारकत घेऊन कम्युनिस्ट पक्षाच्या नियंत्रणाखाली काम करू लागली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनापासून अलिप्त राहिली. परिणामी, किसान सभेची लोकप्रियता कमी होऊन सदस्य संख्या सुद्धा कमी झाली. अनेक सदस्यांनी किसान सभेच्या आदेशाचे उल्लंघन करून भारत छोडो आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे स्वामी सहजानंद सरस्वती, एन.जी. रंगा आणि इतर

महत्त्वाच्या लोकांनी किमान सभेतून बाहेर जाण्याचा निर्णय घेतला. कम्युनिस्ट पक्षाच्या विभाजनाचा परिणाम म्हणून अखिल भारतीय किसान सभेचेही दोन भाग झाले. आज अखिल भारतीय किसान सभा (अजय भवन) आणि अखिल भारतीय किसान सभा (अशोक रोड) अशा दोन संघटना अस्तित्वात आहेत.

महाराष्ट्राच्या जळगाव जिल्ह्यातील फैजपूर या गावामध्ये १९३७ साली भरलेल्या अधिवेशनात ग्रामीण कर्जबाजारीपणा हा मुद्दा उचलून धरला. यापूर्वीच १९२६ साली नेमलेल्या रॉयल कमिशन ऑफ अॅग्रीकल्चरने १९२८ मध्ये आपला अहवाल सादर केला आणि त्यात असे मत नोंदवले की, ''भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो, कर्जात मरतो आणि आपल्या वारसावर कर्जाचा भार ठेवून जातो.'' भारतामध्ये शेती आणि शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा संस्थात्मक आणि गैर संस्थात्मक अशा दोन मार्गाने होत असतो.

गैरसंस्थात्मक स्रोतामध्ये सावकार व महाजन, व्यापारी व कमिशन एजंट, जमीनदार, नोकरदार आणि मित्र व नातेवाईक यांचा समावेश होतो. सावकारी कर्जाचा व्याजदर जास्त असला तरी, कर्ज मिळण्याची प्रक्रिया सुलभ असल्यामुळे शेतकरी या कर्जाला अधिक पसंती देतो. विदर्भ, मराठवाड्यातील सावकार कर्ज देत असतानाच शेतकऱ्यांची जमीन आपल्या नावे खरेदी करून घेतो. दरमहा दर शेकडा १८ ते ३६ टक्के इतका जास्तीचा व्याजदर आकारला जात असल्यामुळे शेतकऱ्याला जमिनीवरील आपला हक्क गमवावा लागतो. कधी ओला तर कधी दुष्काळ शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेला असतो

किसान आंदोलनाचा परिणाम म्हणून संस्थात्मक कर्जाचा पर्याय पुढे येतो. संस्थात्मक कर्ज पुरवठ्यामध्ये वेगवेगळ्या संस्थांचा समावेश केला जातो. ज्यामध्ये व्यापारी बँका, सहकारी बँका आणि पतपुरवठा संस्था, भारतीय स्टेट बँक, क्षेत्रीय ग्रामीण बँका, भारतीय रिझर्व्ह बँक, अग्रणी बँक योजना, राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक आणि सरकारचा समावेश होतो.


18/25

## शेती क्षेत्रातील संस्थात्मक कर्जपुरवठा

| कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था/ तपशील | २०१२-१३ | २०१४-१५ | २०१६-१७ | २०१८-१९ | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|
| सहकारी बँका | १०२५९२ | १३०३५० | १३१८८० | १४२७५० | ५५८१२१ |
| प्रादेशिक ग्रामीण बँक | ५५९५७ | ८९३२६ | १०५००१ | १२५६५४ | १७९२६७ |
| व्यापारी बँका | ३१४९५१ | ४१५७३६ | ४५२५७६ | ४८३८०५ | १५६३६९ |
| अ) एकूण अल्पकालीन कर्ज पुरवठा | ४७३५०० | ६३५४१२ | ६८९४२७ | ७५२२०९ | ८९३७५७ |
| सहकारी बँका | ८६११ | ८११९ | १०८७८ | ९५९१ | ६३६५८३ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | ७७२४ | १३१३५ | १८२१५ | २४०१३ | ११४१५ |
| व्यापारी बँका | ११७५४० | १८६४० | ३४७२०५ | ४७१०१७ | ३३६४३ |
| ब) मध्यम/दीर्घ मुदती कर्ज पुरवठा | १३३८७५ | २०९९१६ | ३७६२९८ | ५०४६२० | ६८१६४१ |
| सहकारी बँका | १११२०३ | १३८४६९ | १४२७५८ | १५२३४० | १९४७०४ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | ६३६८१ | १०२४८३ | १२३२१६ | १४९६६७ | १९०६८२ |
| व्यापारी बँका | ४३२४९१ | ६१४३७६ | ७९९७८१ | ९५४८२३ | १९००१२ |
| एकून (अ आणि ब) | ६०७३७५ | ८४५३२८ | १०६५७५५ | १२५६८३० | १५७५३१८ |

Source : Agricultural Statistics at a Glance, 2021, Page No. 302



19/25

संस्थात्मक पतपुरवठ्याची वरील आकडेवारी लक्षात घेता अल्प मुदतीचा कर्जपुरवठा हा मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या तुलनेत जास्त आहे. शेतीमध्ये कायमस्वरूपी सुधारणा करण्यासठी दीर्घ मुदतीच्या कर्जाची जास्त आवश्यकता आहे, परंतु तो दिला जात नाही असे चित्र आहे. त्यामुळे बहुसंख्य शेतकरी वर्ग हा गैरसंस्थात्मक कर्जे घेण्याकडे वळतो. ज्याची वास्तव आकडेवारी सरकारकडे नाही. किसान सभेने आपल्या स्तरावरून शेतकऱ्यांनी घेतलेल्या गैर संस्थात्मक कर्ज पुरवठ्याची आकडेवारी गोळा करण्यासाठी अभ्यास समिती नियुक्त करावी. संस्थात्मक कर्ज पुरवठ्यातील अडथळे दूर करण्यास भाग पाडून शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदराने पुरेसा व वेळेत कर्ज पुरवठा होण्यासाठी प्रयत्न करावेत.

शेवटी शेतकऱ्याच्या हलाखीवर कर्ज पुरवठा हा उपाय परिपूर्ण असू शकत नाही. शेतकऱ्यांना पाणीपुरवठा आणि स्वामिनाथन समितीने केलेल्या सूचनेनुसार उत्पादन खर्च आणि ५० टक्के नफा धरून किंमत मिळाली तर, शेतकरी कसल्याही प्रकारच्या कर्जाची मागणी करणार नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या मागण्या मंजूर करण्यास सरकारला भाग पाडण्यासाठी किसान सभेने एक व्यापक राष्ट्रव्यापी आंदोलन उभारण्याची गरज आहे.

■